**<u>प्रेस नोट</u>**

दहिसर पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक २८/०८/२०२६.

**<u>मोटार सायकल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करुन ०४ आरोपी जेरबंद तसेच उत्तर प्रादेशिक विभागातील पोलीस ठाणेतील ०८ मो/सायकल चोरीचे गुन्हे उघडकिस आणुन स्क्रॅप गोदामातुन २४ मोटारसायकलींचे नंबर प्लेटस, चेसीज, इंजिन तसेच इतर पार्टस हस्तगत केलेबाबत....</u>**

दहीसर पोलीस ठाणे हद्दीत राहवयास असलेले फिर्यादी यांची हिरो होन्डा कपंनीची सुपर स्प्लेडंर मोटार सायकल न. MH 02 AZ 4549 ही दिनांक २०.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ते दिनाक २१.०८.२०२६ रोजी रात्री ०९.०० वा चे सुमारास फिर्यादी यांनी देसाई चाळ, शिववल्लभ रोड, अशोकवन, दहिसर पुर्व मुंबई या ठिकाणी रोडवर पार्क करून ठेवलेली होती. सदर मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतिशिवाय, चोरून नेली असल्याने फिर्यादी यांनी अज्ञात चोरटयाविरुध्द तक्रार दिली असता दहीसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२४४/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हा नोंद झाल्यानंतर मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक हेमंत गिते व त्यांचे पथकाने घटनास्थळावरील तसेच आजुबाजुच्या परीसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यास सुरुवात केली. त्यादरम्यान तीन इसम हे मिळुन एका बाईकवरुन चोरी गेलेली बाईक ही धक्का मारत घेवुन जात असल्याचे फुटेजमध्ये दिसुन आले. सदर फुटेजचा माग घेतला असता संशयीत आरोपी हे धक्का मारण्यासाठी घेवुन आलेल्या बाईकवर एक रेडीयमने काढलेले चित्राचा माग घेत असता सदर बाईक ही दहीसर पोलीस ठाणेच्या हददीत साईबाबा मंदीर रोड, दहीसर पुर्व या ठिकाणी पार्क केलेली मिळुल आली. तसेच संशयित आरोपी हे आनंदनगर परीसरात असल्याची माहीती प्राप्त झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना ताब्यात घेवुन तपास केला असता गुन्हयातील ०४ आरोपी हे जास्तीत जास्त दिवस पार्क असलेल्या गाडयांवर लक्ष ठेवुन त्या चोरी करुन एका गाडया स्क्रॅप करणाऱ्या इसमास गाडया विक्री करीत असत व सदर इसमा हा सदर गाडया पुर्ण खोलुन त्या गाडयाचे पार्ट वेगवेगळे करुन भंगारमध्ये विकत असे. सदर पार्क केलेल्या स्क्रॅप करणाऱ्या इसमाच्या गोडावुन वर छापा टाकुन त्यास ताब्यात घेतले. तसेच त्याचे गोडावुन मधुन काही मोटारसायकल तसेच २४ मोटारसायकलच्या नंबर प्लेटस, चेसीज, इंजिन तसेच इतर पार्टस हस्तगत करण्यात आले. त्याबबात अधि तपास चालु आहे.

**सदर तपासादरम्यान एकुण ०८ मोटारसायकल, २४ मोटारसायकलच्या नंबर प्लेटस, चेसीज, इंजिन तसेच इतर पार्टस हस्तगत करण्यात आले आहे. तसेच अदयापर्यंत खालील पोलीस ठाणेचे गुन्हे हे उघडकिस आणण्यात आले आहे.**

**१) दहीसर पोलीस ठाणे ०४ गुन्हे**
**२) एमएचबी पोलीस ठाणे ०२ गुन्हे**
**३) कस्तुरबा पोलीस ठाणे ०१ गुन्हा**
**४) मालवणी पोलीस ठाणे ०१ गुन्हा**

**अटक आरोपीताचे नाव व पत्ता:-**

१) रोनीत भास्कर शेट्टी, २३ वर्षे, राठी. दहिसर पुर्व, मुंबई.
२) पंकज संगलप्रसाद गुप्ता, वय २० वर्षे, राठी. केतकीपाडा, दहिसर पुर्व, मुंबई.
३) आशुतोष संतोष दुबे, वय २० वर्षे, राठी. धारखाडी रोड, दहिसर पुर्व, मुंबई.
४) पिंटु छोटेलाल गुप्ता वय २९ वर्षे, राठी. केतकीपाडा,दहिसर पुर्व मुंबई. (गाडया स्क्रॅप करणारा)
५) अ.ब.क., वय १७ वर्षे ८ महीने, राठी. आनंद नगर, दहिसर पुर्व, मुंबई.
**( विधी संघर्षग्रस्त बालकास पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे. )**

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री. शशिकुमार मीना, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. श्री.गजानन राजमाने , पोलीस उप आयुक्त उत्तर परिमंडळ ०३, मा. श्री.जयराज रणवरे , सहायक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, मा. श्री. सर्जेराव पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक दहिसर पोलीस ठाणे, श्री मारुती सांगळे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक हेमंत गिते, पो.ह. अमोल जाधव, पो.ह. अमित पाटील, पो.ह. शाहनवाज सय्यद, पो.शि. सुशांत जाधव, पो.शि. कपिल चौधरी, पो.शि. महेंद्र महाले, पो.शि. ओमकार राणे व पो.ह. सागर पवार (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.

-----0000------